REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्रियांच्या समस्या

प्रा. डॉ. दत्तात्रय बारबोले
मराठी विभाग प्रमुख, शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.

**प्रस्तावना:**

आपणास माहित आहे की,भारतात कशा प्रकारे समाज व्यवस्था बदलत गेल्या मी फार पूर्वीपासून सुरुवात करत नाही.आपण राजेशाहीपासून पुढे सुरुवात करून राजेशाही नंतर हुकुमशाही म्हणजेच इंग्रजी शासन व त्यानंतर लोकशाही आली.जी आपणास भ्रमीत करणारी आहे.आपल्याला स्वत:चे मत मांडण्यास आली का हो ? निश्चितच नाही. जोपर्यंत भांडवलदार व्यक्ती सामान्य जनतेची लुट करणे थांबवत नाही,तोपर्यंत तरी लोकशाही आली असे म्हणता येणार नाही.



भांडवलशाहीच रूप आज आपल्याला दिसत असल तरी या पाठीमागील समाजव्यवस्थेमध्येही ती होतीच.पण आपल्याच पैशाच्या जोरावर आपल्यावर राज्य चालवलं आहे.याची जाणीव कल्पना लोकांना नव्हती,नाही तर गावच्या पाटलांनी सामान्य जनतेचा छळ मांडला नसता.इंग्रजांचे कर वसुली हे भांडवलशाहीचेच उदाहरण म्हणता येईल.आज ही काही शक्तीशाली व्यक्ती जनतेच्या,श्रमिकांच्या आर्थिक साधनांवर आपला अधिकार राखून ठेवताहेत. या अशा समाजव्यवस्थेविरुद्ध भगतसिंग, सुखदेव, राजगुरू या क्रांतिकारकांनी लढा उभारला. या तिघांनी फाशी देण्याच्या तीन दिवसांपूर्वी आपल्याला फाशी देण्याऐवजी गोळ्या घालण्याची मागणी एका पत्रातून केली होती.त्यात त्यांनी म्हटले की,युद्ध सुरु झालेलं आहे आणि हे युद्ध तोपर्यंतच सुरूच राहील. जोपर्यंत शक्तिशाली व्यक्ती भारतीय जनता आणि श्रमिकांच्या आर्थिक साधनावर आपला अधिकार राखून ठेवतील.मग अशा व्यक्ती ब्रिटीश भांडवलदार म्हणून इंग्रज शासक किवा खुद्द भारतीयअसोत या सर्वांनी संगनमत करून लुटीचे कारस्थान रचले आहे.जर शुद्ध भांडवलदारच निर्धनाचे रक्त शोषत असतील तर परिस्थितीत काहिच फरक पडणार नाही आणि आज नेमके तेच घडत आहे.राजेशाही असो,इंग्रज शासन असो वा आजची लोकशाही काही ठराविक शुद्ध भारतीय भांडवलदार सामान्य कष्टकरी जनतेची लुट करीत आहेत.नाही तर महाराष्ट्रात नव्हे तर भारतात हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या नसत्या.या अशा समाजव्यवस्थेमध्ये जरी सामान्य जनता भरडली जात असली तरी याचे परिणाम जास्तीत जास्त स्त्रियांवर होताना दिसतो.एखाद्या शेतकऱ्याने कर्जाला कंटाळून आत्महत्या केली असली तरी दु:खाची वीज मात्र त्या घरातील स्त्री व मुलांवर कोसळते. छ.शिवरायानंतर मध्ययुगीन महाराष्ट्राला पारतंत्र्याच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी झगडणारी त्यांची सून महाराणी ताराबाई हिने कोल्हापूरचे

राज्य स्थापन केले. अशा या छोट्या राज्याच्या २४ वर्षाच्या विधवा राणी ताराबाईने महाराष्ट्राचा जुलमी शत्रू औरंगजेबाशी सतत ७ वर्षे अविश्रांत लष्करी व राजनैतिक झुंज दिली.तिने केलेला संघर्ष राजकीय असला तरी त्या काळात राजकीय स्वातंत्र्यातच सामाजिक व सांस्कृतिक स्वातंत्र्य दडले होते.कोल्हापूरसारख्या एका छोट्या राज्याची २४ वर्षाची राणी मोगल बादशहाशी सतत झुंज देते व त्याला पराभूत करून त्याला याच महाराष्ट्रात चिरशांती घ्यायला लावते.हे देशाच्या नव्हे जगाच्या इतिहासातील एकमेव उदाहरण आहे.आणि याचा मला अभिमान आहे.तसेच जिजाबाईचे उदाहरण याठिकाणी देता येणे शक्य आहे या ताराबाईच्या सुनेने कोल्हापूरचे स्वतंत्र अस्तित्व राखून ठेवले.

याचबरोबर डॉ.कृष्णाताई केळवकर व राणी इंदुमती या स्त्रियांनीही स्त्रीशिक्षण व स्त्रीआरोग्य यावर लक्ष केंद्रित केले व त्यासाठी त्या झटल्या.अशा कर्तृत्वान स्त्रियांची उदाहरणे जरी आपण देत असलो तरी निवडक स्त्रियांचीच आपण उदाहरणे देऊ शकतो.पण संपूर्ण महाराष्ट्रातील स्त्री वर्ग मात्र पुरुष वर्चस्वाखाली दडपलाच जात होता.स्त्रियांनी घराबाहेर पडायचे नाही.पुरुष मंडळी बोलत बसले असल्यास बाहेर यायचे नाही.रस्त्यावरून जाताना खाली मान घालून जायचे.पुरुषासमोर बोलायचे नाही,मुस्लीम स्त्रियांनी बुरखा घातलाच पाहिजे.स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाही.घरचा कर्ताधर्ता पुरुष त्यामुळे सगळे निर्णय त्यानेच घ्यायचे.स्त्रियांनी फक्त घर सांभाळायचे या अशा समाजव्यवस्थेत राजर्षी शाहूंची कारकीर्द स्त्रीमुक्त व स्त्रीउद्धाराची मुहूर्तमेढ होती.शाहूकालीन महाराष्ट्रातील बहुजन समाजातीलही वर्णवर्चस्वावादी गुलामगिरीत गुरफटला होता.या बहुजन समाजातीलही अर्धी संख्या स्त्री वर्गाची होती.तो स्त्री वर्ग पुरुषवर्चस्वाखाली व त्यांनी निर्माण केलेल्या गुलामगिरीखाली झिजत होता.या बहुजन समाजाला वर्णवर्चस्वापासून सुटका हवी होती तोच समाज आपल्या घरातील स्त्रियांना मात्र पुरुषी वर्चस्वाखाली दडपत होता.या स्त्रियांच्या उद्धारासाठी,मुक्तीसाठी शाहूंनी कार्य केले व यासाठीच त्यांनी पाच कायदे केले.

१. पुनर्विवाह कायदा
२. अंतरजातीय - आंतरधर्मीय विवाह कायदा.
३. स्त्री अत्याचारांना प्रतिबंध करणारा कायदा
४. घटस्फोटाचा कायदा
५. जोगतिणी प्रतिबंध कायदा

हे झाले इतिहासाबद्दल : आजही अनेक स्त्रियांच्या बाबतीत अनेक कायदे आहेत.पण तरीही स्त्रियांच्यावरील अत्याचारात वाढच झालेली दिसते.आजही मध्यमवर्गीय व गरीब कुटुंबात मुलगा व मुलगी यापैकी एकालाच शिकवण्याची परिस्थिती असल्यास प्राधान्य मुलग्यालाच दिले जाते.आजही लग्न हेच मुलींच्या आयुष्याचे सार्थक अशी मानसिकता आपली आहे.या भांडवलशाही समाजव्यवस्थेचाच एक परिणाम म्हणता येईल.भारतीय लोकशाहीत स्त्रीला स्वातंत्र्य आहे,असे असले तरी प्रत्यक्षात मात्र स्त्री अजूनही गुलामगिरीतच आहे.एका बाजूला सरकारने स्त्रियांना महाविद्यालयापर्यंतचे शिक्षण मोफत दिले असले तरी त्यापुढील शिक्षणाचे जे खाजगीकरण झाले आहे.त्याच्यातून मात्र स्त्रियांच्या उच्चशिक्षितांच्या संध्या हिरावून घेतल्या जात आहेत.गुणवत्ता असूनही वैद्यकीय शिक्षण परवडत नाही.म्हणून डॉक्टर व्हायचे नाकारणाऱ्या मुली वैफल्यग्रस्त जीवन जगत असल्याची उदाहरणे आपणास दिसतात.अशा या समाजव्यवस्थेने स्त्रीशिक्षण मोफत केले असले तरी खाजगीकरणातून त्यांचे शिक्षण हिरावून घेतले आहे.

आज आपण म्हणतो की,आपल्या देशात लोकशाही आहे.आजही काही ठराविक लोकच आपल्या पैशाचा वापर करत आपल्यावर वर्चस्व प्रस्थापित करीत आहेत.ज्यांच्याकडे भरपूर पैसा आहे.त्यांच्यात चंगळवाद बोकाळलेला आहे.त्याचा परिणाम म्हणजे स्त्रियांना वस्तू म्हणून पहिले जात आहे.स्त्रीचे शरीर एक वस्तू बनलेआहे.पर्यटन विकास धोरणाच्या नावाखाली लहान मुली व स्त्रियांच्या विक्रीमध्ये प्रचंड वाढ झाली आहे.शिक्षण घेण्याच्या वयात त्यांना वेश्या व्यवसायात ओढले जात आहे.शाळा,महाविद्यालय शिकणाऱ्या मुलींची छेडछड एकतर्फी प्रेम,अपहरण,बलात्कार यामुळे स्त्री शिक्षणावर गदा आलेली आहे.स्त्री स्वतःच्या घरातदेखील असुरक्षित बनली आहे.मुलींचा गर्भपात असे अनेक परिणाम आपल्याला या भांडवलशाही समाजामध्ये झालेले आढळतात. या सर्व बाबींना रोखण्यासाठी कायद्यात व्यवस्था आहे.पण न्यायदानातील

विलंब,असंवेदनशील पोलीस यंत्रणा यामुळे स्त्रियांना कायदा सुव्यवस्थेवर विश्वास राहिलेला नाही यामुळे तक्रारीही कोणी करत नाही.

याच भांडवलशाही व्यवस्थेने खाजगीकरणाचा उदो उदो होत आहे.स्त्रियांना उच्चशिक्षण घेणे कठीण होत आहे.त्याठिकाणी भांडवलदार त्याचा शारीरक,मानसिक व आर्थिक छळ करीत आहेत.

कॉलेज करीत काही काम करावे म्हणून महाविद्यालयाच्या मुली छोटी - छोटी कामे स्विकारतात.अशा कामांना पुरुषांचे पगार परवडत नाहीत किवा पुरुषांना जास्त किंमत द्यावी लागते.म्हणून भांडवलदार,स्त्रियांना,मुलींना अशा नोकऱ्या देतात.पण पगार किवा त्यांच्या कामावर मोबदला देताना स्त्री ही पुरुषापेक्षा दुर्बल असते असे कारण पुढे करून त्यांच्याकडून काम कमी होते असे सांगून मोबदला कमी दिला जातो.८ ते १० तासे कामाचे ठरवून १० ते १२ तास गरज पडल्यास १४-१५ तास त्यांच्याकडून काम करून घेतले जाते पण मोबदला तेवढाच.

नुकत्याच विधानसभेच्या निवडणुका पार पडल्या लोकशाही पद्धतीने जरी या निवडणुका घेतल्या असल्या तरी प्रत्यक्षात मात्र निवडणुका या भांडवलशाही पद्धतीने झाल्या.समाजातील ५० % मतदार वर्ग हा स्त्री वर्ग आहे.जो कित्येक वर्षानुवर्षे या राजकारणापासून दूर राहिलेला आहे.याचाच विचार करून काही राज्यकर्त्यांनी स्त्रियांना यांचे लक्ष बनविल्याचे दिसते.स्त्रियांना हळदी कुंकुवाचे करंडे देणे,भेटवस्तू देणे असे कार्यक्रम घडवून आणले.काही महाभागांनी तर पुरुषांची जेवणावळ तर सारखीच होते पण म्हणून स्त्रियांची जेवणावळ घातली.महिला बचत गटांना म्हणून चेक देण्यात आले.अशा हुशार राज्यकर्त्यांनी आपल्या पैशाचा की जो श्रमिकांच्या जीवावर कमविला आहे.त्याचा वापर करून अशा पद्धतीने निवणुका लढविल्या व स्त्रीला असणारे मतदानाचे स्वातंत्र्यही हिरावून घेतले आहे.

अशा या भांडवलशाही समाजव्यवस्थेमध्ये स्त्री स्वतंत्र आहे असे ऐकायला जरी बरे वाटत असले तरी ते स्वातंत्र्य प्रत्यक्षात मात्र गहाण पडलेले आहे.म्हणूनच आम्हाला अशी समाजव्यवस्था हवी आहे की,जी स्त्रीला माणूस म्हणून जगवेल.